वाचा- १) साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७
२) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५
३)मेस्मा (अमेंडमेंट) ॲक्ट २०११
४) द मुंबई नर्सिंग होम (अमेंडमेंट) ॲक्ट २००६
५) द बॉम्बे पब्लीक ट्रस्ट ॲक्ट, १९५०
६) शासन निर्णय क्र.कोरोना-२०२०/प्रक्र.३९७/आरोग्य-५ दि.२४.०९.२०२०.
७) आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांचे आदेश क्र.जा.क्र.नावाशमनपा /आ कक्ष/२९९/२०२०, दि.०२.०९.२०२०

**विषयः- कोविड/नॉन कोवीड रुग्णांसाठी HRCT चाचणीचे दर निश्चित करणेबाबत.**

जा.क्र.२०२०/आपत्ती व्यवस्थापन/टे-१/सीआर.
जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
दि. .०९.२०२०

# परिपत्रक

कोव्हीड /नॉन कोवीड रुग्णांसाठी सीटी स्कॅन सारख्या तपासण्यांची आवश्यकता भासत असल्याने तपासणीसाठी खाजगी रुग्णालये किंवा सीटी स्कॅन तपासणी सुविधा उपलब्ध असलेल्या तपासणी केंद्राकडून अवाजवी रक्कम आकारण्याबाबतच्या तक्रारी जनतेकडून/ लोकप्रतिनिधीकडून शासनाकडे प्राप्त झाल्यामुळे उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयाव्दारे राज्य शासनाने कोव्हीड /नॉन कोवीड रुग्णांसाठी HRCT चाचणीचे दर निश्चित केले आहेत.त्यामधील खालील नमुद तरतुदींचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

०१. जिल्हयातील सर्वसाधारणपणे १६ ते ६४ स्लाईस या क्षमतेच्या मशिन्स HRCT साठी वापरण्यात येत आहेत. त्यानूसार मशिनच्या क्षमतेनूसार HRCT-Chest तपासणीसाठी खालील प्रमाणे कमाल दर मर्यादा निश्चित करण्यात आले आहेत.

| Specification of CT machine | Less than **१६ slice CT** | Multi detector CT **(MD CT) १६-६४ slice** | Multi detector CT (MD CT) **More than ६४ slice** |
|---|---|---|---|
| Proposed rate inclusive of all taxes (in INR) | **२०००/-** | **२५००/-** | **३०००/-** |

उपरोक्त कमाल रकमेत सी.टी.स्कॅन तपासणी, तपासणी अहवाल सी.टी.फिल्म, पी.पी.ई किट, डिसइन्फेक्टंट, सॅनिटायझेशन चार्जेस व जी.एस.टी या सर्वांचा समावेश असेल.

**१)** HRCT-Chest नियमित व तातडीच्या तपासणीसाठी उपरोक्त समान दर लागू रहातील.

**२)** संदर्भ क्र.०६ वर नमूद शासन निर्णय निर्गमित होण्याच्या दिनांकापुर्वी जर कोणत्याही रुग्णालय/ तपासणी केंद्राचे HRCT-Chest तपासणी दर उपरोक्त दरापेक्षा कमी असल्यास, कमी असलेले दर तपासणीसाठी लागू राहतील.

**३)** HRCT-Chest तपासणी केल्यानंतर अहवालावर उपरोक्त पैकी कोणत्या सीटी मशीनव्दारे तपासणी केली आहे ते नमुद करणे बंधनकारक असेल.

Scanned by CamScanner

४) सद्यस्थितीत कोणत्याही डॉक्टरच्या प्रिस्क्रीप्शन्स शिवाय HRCT करण्याची मागणी नागरीकांकडून करण्यात येते. या तपासणीमध्ये किरणोत्सर्जन व्दारे तपासणी असल्याने जोखीम असते यासाठी नोंदणीकृत डॉक्टरांच्या प्रिस्क्रीप्शन्स शिवाय ही तपासणी करु नये.

५) HRCT-Chest तपासणी करणा-या रेडीओलॉजिस्टने संपुर्ण तपासणी अहवाल देणे आवश्यक राहील. (Apart from lung, mediastinum and bones)

६) ज्या रुग्णांकडे आरोग्य विमा योजना आहे किंवा एखाद्या रुग्णालयाने किंवा कार्पोरेट /खाजगी आस्थापनेने जर HRCT तपासणी केंद्राशी सामंजस्य करार केलेला असेल त्या साठी उपरोक्त दर लागु राहणार नाहीत.

७) अन्यथा सर्व रुग्णालये/तपासणी केंद्र यांनी HRCT-Chest तपासणीसाठी निश्चित केलेले दर (मशिनच्या प्रकारानुसार) दर्शनी भागात लावणे तसेच, निश्चित दरानुसार दर आकारणी करण्याबाबत हॉस्पीटल व्यवस्थापनाला सूचना देणेबंधनकारक राहील.

८) HRCT-Chest तपासणीसाठी निश्चित केलेल्या दरापेक्षा अधिक दर आकारणी केल्यास संबंधितांवर कारवाई करण्यासाठी राज्य स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी राज्य आरोग्य हमी सोसायटी व जिल्हा स्तरावर (महानगरपालिका क्षेत्र वगळून ) संबंधित जिल्हाधिकारी व संबंधित महानगरपालिका क्षेत्रात संबंधित महानगरपालिका आयुक्त संदर्भ क्र.०२ ते ०५ मध्ये नमुद केलेल्या कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यास सक्षम प्राधिकारी राहतील.

९) सदर दर आकारणी साथरोग कायद्यांची अंमलबजावणी असेपर्यंत चालू राहतील.

सही/-
(डॉ. विपीन इटनकर)
**जिल्हादंडाधिकारी, नांदेड**

**प्रतिलिपी, माहितीस्तव व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव**

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नांदेड
२) पोलीस अधीक्षक, नांदेड
३) आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना देवून कळविण्यात येते की, संदर्भ क्र.०७ वरील आदेशान्वये, लेखा परीक्षणासाठी नेमलेल्या पथक प्रमुखांच्या निदर्शनास वरील बाब आणून देवून त्याप्रमाणे लेखापरीक्षण करण्याच्या सूचना पथक प्रमुख यांना आपल्या स्तरावरुन द्याव्यात.
४) अधिष्ठाता, डॉ.शंकरराव चव्हाण,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,नांदेड
५) जिल्हा शल्य चिकीत्सक, नांदेड
६) सर्व उपविभागीय अधिकारी, जिल्हा नांदेड
७) सर्व तहिसलदार, जिल्हा नांदेड
८) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद, नांदेड
९) अध्यक्ष, ईंडीयन मेडीकल असोसिएशन, जिल्हा नांदेड यांना देवून सुचित करण्यात येते की, सदर बाब सर्व संबंधितांचे निदर्शनास आपल्या स्तरावरुन आणून द्यावी व याची काटेकोरपणे पालन होईल यांची दक्षता घ्यावी.

**जिल्हादंडाधिकारी, नांदेड**

Scanned by CamScanner